MHST090000581995

## नि.दि.दा.क्र.१०/१९९६ मधील निशाणी क्र. १४३ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज जादा सरतपास दाखल करण्याकरीता दाखल केला आहे. सदरील अर्ज व नि.क्र. १४५ वर असलेले प्रतिवादीचे म्हणणे याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, वादीचा सरतपास व उलटतपास निशाणी २१ येथे दाखल आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे निर्णयानुसार फेरसुनावणीबाबत दावा नेमला आहे. दावा दाखल केल्यानंतर वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती केली आहे व प्रतिवादींनी त्या अनुषंगाने जादा कैफियत दाखल केलेली आहे. तसेच दिनांक १८/०६/१९७३ रोजी मुळ खरेदीदस्त प्रतिवादीचे ताब्यात भोगवटयास असल्याबाबत व ते खरेदीखत प्रतिवादीने हजर करणेबाबत वादीने प्रतिवादीस नोटीस दिलेली आहे. या कामातील वादी साक्षीदार क्र.२ बजरंग चव्हाण हे मयत झालेले आहेत. त्या अनुषंगाने वादीस जादा सरतपास देणेचा आहे.

३. सदर जादा सरतपास दाखल केलेस प्रतिवादीस कसलिही तोशिष लागणार नाही. तसेच वादीचा उलटतपास करणेस प्रतिवादीस अवसर मिळणार आहे व वादी, प्रतिवादी यांचे दरम्यान विवादय मुद्दयांचे निराकरण करणेस मे. कोर्टास मदतच

होणार आहे. त्यामुळे, वादीचा जादा सरतपास दाखल करणे न्यायाचे हिताचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब, जादा सरतपास दाखल करुन घेण्याची त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांनी त्यांचे निशाणी १४५ ला म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीचा सदरील अर्ज व त्यासोबतचे प्रतिज्ञापत्रामधील सर्व मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. वादीस दावा दुरुस्तीच्या अनुषंगाने सरतपास देता येईल त्यापेक्षा जादा सरतपास वादीस देता येणार नाही.

५. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीचा साक्षीदार क्र.२ बजरंग चव्हाण मयत झालेबाबतची वस्तुस्थिती या मे. कोर्टाचे रेकॉर्डवर आलेली आहे. तसेच दिनांक १८/०६/१९७३ चा दस्त प्रतिवादी यांना मिळून येत नाही याबाबत म्हणणे प्रतिवादीने यापूर्वीच दाखल केले आहे. त्यामुळे रेकॉर्डवर already आलेल्या facts बाबत जादा सरतपास देता येणार नाही.

६. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीचा जादा सरतपास वादी प्रतिवादी यांचे मधील वादाचे निराकरण करणेसाठी आवश्यक नाही. केवळ दावा दुरुस्तीबाबतच वादीस जादा सरतपास देता येईल. वादी हा दावा दुरुस्त केल्याचा गैरफायदा घेवून दुरुस्त दाव्यामध्ये नसणा–या बाबी जादा सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद करु पाहत आहे ही वादीची लबाडी आहे. वादीचा हेतु प्रामाणीक

नाही.

७. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, हा दावा मा. उच्च न्यायालयाने विहीत मुदतीमध्ये निर्णित करावा असा आदेश आहे. परंतु, वादी दुरुस्ती अर्ज व जादा सरतपास देवून दाव्याची सुनावणी लांबणीवर टाकत आहे व कोर्टाची दिशाभुल करु पाहत आहे. सबब, वादीचा निशाणी १४३ चा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा व वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन घेण्यात येवू नये अशी त्यांनी विनंती केली आहे.

८. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरील दाव्यामध्ये निशाणी १३७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती होण्याबाबत अर्ज दाखल केला होता. सदरील अर्जाला प्रतिवादींनी हरकत नोंदवली होती. सदरील निशाणी १३७ वरील आदेश होवून वादीने दाव्यात मागितलेली दुरुस्ती करण्याची परवानगी वादीला देण्यात आली होती. त्यानंतर वादीने सदरील अर्ज दाखल करुन सदरील वादीचा जादा सरतपास देण्याबाबत विनंती केली आहे.

९. वादीने सदरील अर्जामध्ये सदरील दुरुस्ती प्रमाणे जादा सरतपास देण्याकरीता त्याचप्रमाणे दिनांक १८/०६/१९७३ रोजी मुळ खरेदीदस्त प्रतिवादीच्या ताब्यात असल्याबाबत व तो प्रतिवादीने हजर करण्याबाबत वादीने प्रतिवादीस नोटीस दिलेली आहे व या कामातील वादी साक्षीदार क्र.२ बजरंग चव्हाण हा मयत झालेला

आहे याबाबत देखील जादा सरतपास देण्याची विनंती वादीने केल्याचे या ठिकाणी दिसून येते. प्रतिवादीने सदरील वादीच्या दुरुस्तीशिवाय असणा–या जादा सरतपासाला हरकत नोंदवली.

१०. पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन करुन व या ठिकाणी वादीने सदरील दुरुस्तीनंतर सदरील दुरुस्तीबाबतचा मजकूर याबाबत जादा सरतपास देणे योग्य असल्याचे दिसून येते. तर पुढील जादा सरतपास म्हणजे "वादीने प्रतिवादीस नोटीस देवूनही प्रतिवादीने दिनांक १८/०६/१९७३ रोजी मुळ खरेदीदस्त हजर केला नाही. म्हणून तारीख १८/०६/१९७३ च्या खरेदीपत्राची प्रमाणीत प्रत वादीने याकामी तारीख ३०/०८/२०२५ रोजी दाखल केलेली आहे. ती अस्सल वर हुकूम आहे. त्यास निशाणी देण्यात यावी. वादीतर्फे साक्षीदार क्र.२ बजरंग जगन्नाथ चव्हाण याचा सरतपास व उलटतपास निशाणी २६ येथे दाखल आहे. वादीचा हा साक्षीदार मयत झालेला आहे." या वादीच्या जादा सरतपासाला या ठिकाणी परवानगी देण्यात येत नाही. कारण वादीने त्याच्या दुरुस्तीनंतर केवळ दुरुस्ती मजकूराप्रमाणे जादा सरतपास देणे न्याय व योग्य आहे. वादीने नमुद केलेल्या दुरुस्ती शिवाय असणा–या बाबी वादीने त्याच्या दाव्यामध्ये नमुद केलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे त्याबाबत वादीने दाव्यात दुरुस्ती देखील केलेली नाही. त्यामुळे दाव्यात नमुद नसणा–या बाबी बाबत वादीला जादा सरतपास देता येणार नाही. करीता सदरील अर्ज अंशतः मंजूर करणे न्याय व योग्य आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. वादीस निशाणी क्र.१३७ वरील दुरुस्तीप्रमाणे जादा सरतपास देण्यास परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR

Digitally signed by PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Date: 2025.11.24 17:53:42 +0530

स्थळ : कोरेगाव ( पी.डी.यवतकर )

दिनांक : २०/११/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.